PUDHARI, Mumbai, 17.11.2023
Page No. 1, Size:(19.31)cms X (8.32)cms.

Bullet train project's first tunnel work is completed : in a distance of 507 kilometres there will be 7 tunnels, internal work also speeds up.

# बुलेट ट्रेनच्या पहिल्या बोगद्याचे काम पूर्णत्वास

## ५०८ किमी अंतरात असणार सात बोगदे; अंतर्गत कामेही गतिमान

**पालघर : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदाबाद शहरादरम्यानच्या बुलेट ट्रेन मार्गातील महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील पहिला बोगदा पूर्णत्वास नेण्यास यश आले आहे. एकूण ५०८ किमी अंतर असलेल्या बुलेट ट्रेनच्या मार्गात एकूण सात ठिकाणी बोगदे असणार असून त्यातील झरोली गावातील पहिल्या बोगद्याचा ब्रेक थ्रू नुकताच यशस्वी करण्यात आला. यावेळी प्रकल्पाचे अधिकारी, अभियंते आणि कामगार यांनी जल्लोष साजरा केला.

देशातील मुंबई ते अहमदाबाद या दोन महानगरांना जोडणाऱ्या एकूण ५०८ किमी अंतराच्या बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. कमाल ३२० किमी वेग असणारी बुलेट ट्रेन अवघ्या दोन तासांत मुंबई ते अहमदाबाद हे अंतर कापणार आहे. गुजरात आणि दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशात या प्रकल्पाचे प्रत्यक्ष जमिनीवरील कामास प्रारंभ झाला आहे. मात्र महाराष्ट्रात या प्रकल्पाला विविध कारणामुळे विलंब झाला होता. सध्या भूसंपादनाचे काम पूर्ण झाले असून लवकरच प्रत्यक्ष स्थापत्य कामाला देखील सुरुवात होणार आहे.

बुलेट ट्रेन मार्गात एकूण सात ठिकाणी जमिनीखालील बोगदे असणार असून यातील सहा बोगदे हे महाराष्ट्रात तर एकमेव बोगदा गुजरात राज्यात असणार आहे. महाराष्ट्र गुजरात सीमेवरील झरोली गावातील पहिल्या बोगद्याचे खोदकाम नुकतेच पूर्ण करण्यात आले आहे. एकूण ३५० मीटर लांबी असलेल्या या बोगद्याचे खोदकाम न्यू ऑस्ट्रियन टनेल या अत्याधुनिक पद्धतीने (एन.ए.टी.एम) अवघ्या दहा महिन्यात पूर्ण करण्यात आले असून अंतर्गत भागातील आवश्यक कामे सध्या सुरू आहेत.




### बोगद्याची वैशिष्ट्ये

महाराष्ट्र गुजरात सीमेवरील झरोली येथील बोगदा हा बुलेट ट्रेन मार्गातील पहिलाच बोगदा आहे. या बोगद्याचे काम विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आले आहे. यानंतर ठाणे ते मुंबई दरम्यान समुद्राखालून देखील एक बोगदा तयार केला जाणार आहे. विशेष म्हणजे हा देशातील पहिलाच समुद्र खालील बोगदा राहणार आहे.

### मुंबई ते अहमदाबाद प्रवास होणार काही मिनिटात

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे या दोन्ही शहरादरम्यानचे अंतर दोन तास आणि सात मिनिटात पूर्ण होणार आहे. यामुळे या दोन्ही शहरादरम्यानचा प्रवास गतिमान होणार आहे. प्रकल्पासाठी एकूण १.०८ लाख कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे.

**PUDHARI, PALGHAR, 17.11.2023**

**Page No. 1, Size:(19.31)cms X (8.32)cms.**

**Bullet train project's first tunnel work is completed : in a distance of 507 kilometres there will be 7 tunnels, internal work also speeds up.**

# बुलेट ट्रेनच्या पहिल्या बोगद्याचे काम पूर्णत्त्वास

## ५०८ किमी अंतरात असणार सात बोगदे; अंतर्गत कामेही गतिमान

**पालघर : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदाबाद शहरादरम्यानच्या बुलेट ट्रेन मार्गातील महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील पहिला बोगदा पूर्णत्वास नेण्यास यश आले आहे. एकूण ५०८ किमी अंतर असलेल्या बुलेट ट्रेनच्या मार्गात एकूण सात ठिकाणी बोगदे असणार असून त्यातील झरोली गावातील पहिल्या बोगद्याचा ब्रेक थ्रू नुकताच यशस्वी करण्यात आला. यावेळी प्रकल्पाचे अधिकारी, अभियंते आणि कामगार यांनी जल्लोष साजरा केला.

देशातील मुंबई ते अहमदाबाद या दोन महानगरांना जोडणाऱ्या एकूण ५०८ किमी अंतराच्या बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. कमाल ३२० किमी वेग असणारी बुलेट ट्रेन अवघ्या दोन तासांत मुंबई ते अहमदाबाद हे अंतर कापणार आहे. गुजरात आणि दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशात या प्रकल्पाचे प्रत्यक्ष जमिनीवरील कामास प्रारंभ झाला आहे. मात्र महाराष्ट्रात या प्रकल्पाला विविध कारणामुळे विलंब झाला होता. सध्या भूसंपादनाचे काम पूर्ण झाले असून लवकरच प्रत्यक्ष स्थापत्य कामाला देखील सुरुवात होणार आहे.

बुलेट ट्रेन मार्गात एकूण सात ठिकाणी जमिनीखालील बोगदे असणार असून यातील सहा बोगदे हे महाराष्ट्रात तर एकमेव बोगदा गुजरात राज्यात असणार आहे. महाराष्ट्र गुजरात सीमेवरील झरोली गावातील पहिल्या बोगद्याचे खोदकाम नुकतेच पूर्ण करण्यात आले आहे. एकूण ३५० मीटर लांबी असलेल्या या बोगद्याचे खोदकाम न्यू ऑस्ट्रियन टनेल या अत्याधुनिक पद्धतीने (एन.ए.टी.एम) अवघ्या दहा महिन्यात पूर्ण करण्यात आले असून अंतर्गत भागातील आवश्यक कामे सध्या सुरू आहेत.




### बोगद्याची वैशिष्ट्ये

महाराष्ट्र गुजरात सीमेवरील झरोली येथील बोगदा हा बुलेट ट्रेन मार्गातील पहिलाच बोगदा आहे. या बोगद्याचे काम विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आले आहे. यानंतर ठाणे ते मुंबई दरम्यान समुद्राखालून देखील एक बोगदा तयार केला जाणार आहे. विशेष म्हणजे हा देशातील पहिलाच समुद्र खालील बोगदा राहणार आहे.

### मुंबई ते अहमदाबाद प्रवास होणार काही मिनिटात

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे या दोन्ही शहरादरम्यानचे अंतर दोन तास आणि सात मिनिटात पूर्ण होणार आहे. यामुळे या दोन्ही शहरादरम्यानचा प्रवास गतिमान होणार आहे. प्रकल्पासाठी एकूण १.०८ लाख कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे.